CAREERINDIA

# PAPER-III
# MARATHI

**Signature and Name of Invigilator**

1. (Signature) ____________________________
   (Name) ____________________________
2. (Signature) ____________________________
   (Name) ____________________________

OMR Sheet No. : ............................................
(To be filled by the Candidate)

Roll No. [ | | | | | | | ]
(In figures as per admission card)

Roll No.___________________________________
(In words)

**J 3 8 1 4**

Time : 2 ½ hours] [Maximum Marks : **150**

Number of Pages in this Booklet : **12** | Number of Questions in this Booklet : **75**

## Instructions for the Candidates

1. Write your roll number in the space provided on the top of this page.
2. This paper consists of seventy five multiple-choice type of questions.
3. At the commencement of examination, the question booklet will be given to you. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as below :
   (i) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. Do not accept a booklet without sticker-seal and do not accept an open booklet.
   (ii) **Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to pages/questions missing or duplicate or not in serial order or any other discrepancy should be got replaced immediately by a correct booklet from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the Question Booklet will be replaced nor any extra time will be given.**
   (iii) After this verification is over, the OMR Sheet Number should be entered on this Test Booklet.
4. Each item has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the circle as indicated below on the correct response against each item.
   **Example :** (A) (B) ● (D)
   where (C) is the correct response.
5. Your responses to the items are to be indicated in the **OMR Sheet given inside the Booklet only.** If you mark at any place other than in the circle in the OMR Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done in the end of this booklet.
8. If you write your Name, Roll Number, Phone Number or put any mark on any part of the OMR Sheet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, or use abusive language or employ any other unfair means such as change of response by scratching or using white fluid, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return the test question booklet and Original OMR Sheet to the invigilators at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall. You are, however, allowed to carry original question booklet and duplicate copy of OMR Sheet on conclusion of examination.
10. **Use only Blue/Black Ball point pen.**
11. **Use of any calculator or log table etc., is prohibited.**
12. **There is no negative marks for incorrect answers.**

## परीक्षार्थियों के लिए निर्देश

1. इस पृष्ठ के ऊपर नियत स्थान पर अपना रोल नम्बर लिखिए ।
2. इस प्रश्न-पत्र में पचहत्तर बहुविकल्पीय प्रश्न हैं ।
3. परीक्षा प्रारम्भ होने पर, प्रश्न-पुस्तिका आपको दे दी जायेगी । पहले पाँच मिनट आपको प्रश्न-पुस्तिका खोलने तथा उसकी निम्नलिखित जाँच के लिए दिये जायेंगे, जिसकी जाँच आपको अवश्य करनी है :
   (i) प्रश्न-पुस्तिका खोलने के लिए उसके कवर पेज पर लगी कागज की सील को फाड़ लें । खुली हुई या बिना स्टीकर-सील की पुस्तिका स्वीकार न करें ।
   (ii) **कवर पृष्ठ पर छपे निर्देशानुसार प्रश्न-पुस्तिका के पृष्ठ तथा प्रश्नों की संख्या को अच्छी तरह चैक कर लें कि ये पूरे हैं । दोषपूर्ण पुस्तिका जिनमें पृष्ठ/प्रश्न कम हों या दुबारा आ गये हों या सीरियल में न हों अर्थात् किसी भी प्रकार की त्रुटिपूर्ण पुस्तिका स्वीकार न करें तथा उसी समय उसे लौटाकर उसके स्थान पर दूसरी सही प्रश्न-पुस्तिका ले लें । इसके लिए आपको पाँच मिनट दिये जायेंगे । उसके बाद न तो आपकी प्रश्न-पुस्तिका वापस ली जायेगी और न ही आपको अतिरिक्त समय दिया जायेगा ।**
   (iii) इस जाँच के बाद OMR पत्रक की क्रम संख्या इस प्रश्न-पुस्तिका पर अंकित कर दें ।
4. प्रत्येक प्रश्न के लिए चार उत्तर विकल्प (A), (B), (C) तथा (D) दिये गये हैं । आपको सही उत्तर के वृत्त को पेन से भरकर काला करना है जैसा कि नीचे दिखाया गया है ।
   **उदाहरण** : (A) (B) ● (D)
   जबकि (C) सही उत्तर है ।
5. प्रश्नों के उत्तर **केवल प्रश्न पुस्तिका के अन्दर दिये गये OMR पत्रक पर ही** अंकित करने हैं । यदि आप OMR पत्रक पर दिये गये वृत्त के अलावा किसी अन्य स्थान पर उत्तर चिह्नांकित करते हैं, तो उसका मूल्यांकन नहीं होगा ।
6. अन्दर दिये गये निर्देशों को ध्यानपूर्वक पढ़ें ।
7. कच्चा काम (Rough Work) इस पुस्तिका के अन्तिम पृष्ठ पर करें ।
8. यदि आप OMR पत्रक पर नियत स्थान के अलावा अपना नाम, रोल नम्बर, फोन नम्बर या कोई भी ऐसा चिह्न जिससे आपकी पहचान हो सके, अंकित करते हैं अथवा अभद्र भाषा का प्रयोग करते हैं, या कोई अन्य अनुचित साधन का प्रयोग करते हैं, जैसे कि अंकित किये गये उत्तर को मिटाना या सफेद स्याही से बदलना तो परीक्षा के लिये अयोग्य घोषित किये जा सकते हैं ।
9. आपको परीक्षा समाप्त होने पर प्रश्न-पुस्तिका एवं मूल OMR पत्रक निरीक्षक महोदय को लौटाना आवश्यक है और परीक्षा समाप्ति के बाद उसे अपने साथ परीक्षा भवन से बाहर न लेकर जायें । हालांकि आप परीक्षा समाप्ति पर मूल प्रश्न-पुस्तिका तथा OMR पत्रक की डुप्लीकेट प्रति अपने साथ ले जा सकते हैं ।
10. **केवल नीले/काले बाल प्वाईंट पेन का ही इस्तेमाल करें ।**
11. **किसी भी प्रकार का संगणक (कैलकुलेटर) या लाग टेबल आदि का प्रयोग वर्जित है ।**
12. **गलत उत्तरों के लिए कोई नकारात्मक अंक नहीं हैं ।**

www.careerindia.com

CAREERINDIA

# MARATHI
# मराठी
## Paper – III
## प्रश्नपत्रिका – III

**Note :** This paper contains **seventy five (75)** objective type questions of **two (2)** marks each. **All** questions are compulsory.

**सूचना :** या प्रश्नपत्रिकेत विविध पर्याय असलेले **75 (पंचाहत्तर)** प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास **दोन (2) गुण** आहेत. **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

**1.** गीतेच्या १३व्या अध्यायातील ज्ञानाची लक्षणे याविषयावरील महानुभाव संप्रदायाचा टीकाग्रंथ कोणता ?

(A) मूर्तिप्रकाश
(B) सूत्रपाठ
(C) ज्ञानप्रबोध
(D) दृष्टांतपाठ

**2.** 'नवखंड रुक्मिणी स्वयंवर'. कोणी लिहिले आहे ?

(A) नृसिंह
(B) येल्हण
(C) कृष्णमुनी डिंभ
(D) पंडित लक्षधीर

**3.** 'महिकावतीची बखर' ही बखर नसून निरनिराळ्या बखरवजा गद्यपद्य प्रकरणांचा समाहार आहे, असे मत कोणी व्यक्त केले ?

(A) ग. ह. खरे
(B) वि. का. राजवाडे
(C) र. वि. हेरवाडकर
(D) गं. ब. ग्रामोपाध्ये

**4.** 'वेदें आप्त केले तिन्ही वर्ण । दुरावले स्त्रीशूद्रजन न शिवे त्यांचे कान । हे वेदांसिन्यून पै आले' – हे वेदांचे उणेपण कोणी दाखविले ?

(A) एकनाथ
(B) ज्ञानेश्वर
(C) तुकाराम
(D) नामदेव

**5.** 'अजि अक्रूर हा नेतो श्रीकृष्णाला, सखिकाळ कोठुनि ग आला ।' हे गाणे कोणत्या शाहिराने रचले आहे ?

(A) प्रभाकर
(B) होनाजीबाळा
(C) राम जोशी
(D) सगनभाऊ

**6.** 'श्री वेदव्यासानंतरचा महान लोकशिक्षक' असा गौरव कोणत्या संताचा केला आहे ?

(A) एकनाथ
(B) ज्ञानेश्वर
(C) रामदास
(D) तुकाराम

**7.** नाटक व नाटककार यांच्या जोड्या जुळवा.

| | |
|---|---|
| a. संत भानुदास | i. हरिभाऊ आपटे |
| b. दामाजी | ii. बाबाजीराव राणे |
| c. सती पिंगला | iii. वासुदेव नीळकंठ आगटे |
| d. संत तुकाराम | iv. न. चिं. केळकर |
| | v. यशवंत नारायण टिपणीस |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (A) | iv | iii | i | ii |
| (B) | ii | i | iv | iii |

(C) iii i ii iv

(D) v iv iii ii

**8.** नक्षत्रांची फुलाफळांची
कृष्णसख्यांच्या व्यभिचारांची
आणिक झुरत्या युवयुवतींची
खूप जाहली ही रडगाणी ।
धनीजनांशी झुंज खेळुनी
क्षणभर ज्यांना आली ग्लानी
त्यांना आम्ही गाऊ गाणी
ऐकुनि जी चवताळुनि लढतिल
आणि स्थापितिल सत्ता अपुली

असा इशारा कोणत्या काव्यसंग्रहात, कोणत्या कवीने दिला आहे ?

(A) विशाखा - कुसुमाग्रज

(B) चांदरात - अनंत काणेकर

(C) निर्वासित चिनी मुलास - अनिल

(D) आराधना - वा. ना. देशपांडे

**9.** पुढीलपैकी कोणता लघुनिबंध संग्रह ना. सी. फडके यांचा आहे ?

(A) मनाचे संकल्प

(B) राजा राणी

(C) पडछाया

(D) विजेची वेल

**10.** पुढीलपैकी कोणती कादंबरी माधवी देसाई यांची नाही ?

(A) मंजिरी

(B) जिराफ

(C) बिजली

(D) प्रार्थना

**11.** प्रभाकर पाध्ये यांचा कोकणच्या पार्श्वभूमीवर लिहिलेल्या कथांचा संग्रह कोणता ?

(A) तोरण

(B) जळातील मासा

(C) व्याधाची चांदणी

(D) बोणशी

**12.** पुढीलपैकी भाऊ पाध्ये यांची कादंबरी कोणती ?

(A) इहयात्रा

(B) विश्वस्त

(C) मन्वंतर

(D) जेलबर्डस्

**13.** "कवयित्रींच्या भावविश्वामध्ये घर या संकल्पनेला वेगळे महत्त्व आले आहे..... त्याच प्रमाणे आई, मूल, बहीण, आजी, सासू, प्रियकर, पती, वडील, भाऊ, मामंजी, दीर इत्यादी कौटुंबिक नात्यांच्या चौकटीतच ही कविता मुख्यत: रिंगण घेत आहे."

(A) संपूर्ण विधान बरोबर

(B) संपूर्ण विधान चूक

(C) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

(D) उत्तरार्ध बरोबर, पूर्वार्ध चूक

**14.** भाषा सतत बदलत असते, हे तत्त्व मूलभूत मानल्यास कोणती अडचण निर्माण होते ?

(A) तात्त्विक दृष्ट्या बदल अमूक ठिकाणाहून सुरू झाला असे म्हणता येत नाही ?

(B) भाषांची व भाषाकुलांची संख्या कमी होते.

(C) जनक भाषेच्या अस्तित्वाविषयी शंका निर्माण होऊ शकते.

(D) भाषाकुलांचा आराखडा ढोबळ ठरतो.

**15.** पूरक विनियोग, व्यवच्छेदक विनियोग, वैकल्पिक विनियोग या तत्त्वांच्या आधारे कशाची निश्चिती करता येते ?

(A) पदिमाची

(B) स्वनाची

(C) स्वनिमाची

(D) स्वनांतराची

**16.** शिर-मस्तक-डोके-टाळके-टकुरे या शब्दांतून कोणत्या प्रकारचा अर्थ व्यक्त होतो ?

(A) भावपर अर्थ

(B) शैलीगत अर्थ

(C) सांकल्पनिक अर्थ

(D) गुणव्यंजक अर्थ

**17.** भाषाविज्ञानात औपचारिक संज्ञापन व्यवहारातील भाषाप्रयोगाला 'भाषा' असे म्हणतात आणि अनौपचारिक संज्ञापन व्यवहार हा सामान्यत: 'बोली' मधून होत असतो.

(A) संपूर्ण विधान चूक

(B) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

(C) उत्तरार्ध बरोबर, पूर्वार्ध चूक

(D) संपूर्ण विधान बरोबर

**18.** औत, अलीकडे, हळहळ हे शब्द मराठीत कोणत्या भाषेतून आले ?

(A) कन्नड

(B) तमिळ

(C) मल्याळी

(D) तेलुगू

**19.** उच्चारणाच्या बाबतीत स्वनिमव्यवस्थेनुसार कोणत्या भाषेतील शब्दांना वर्णविपर्ययाद्वारे - अमानत > अनामत, कोशिश > कसोशी, मशहूर > महशूर – अशा प्रकारे बदलून घेतले आहे ?

(A) दख्खिनी हिंदी

(B) फारसी

(C) अरबी

(D) उर्दू

**20.** 'सौन्दर्यमलंकारः ।' हे सूत्र कोणाचे ?

(A) कुंतक

(B) दंडी

(C) वामन

(D) भरत

**21.** 'सालंकारस्य काव्यता' । – अलंकार विद्यमान असतो तेच काव्य, हा आग्रह कोणाचा ?

(A) कुंतक

(B) मम्मट

(C) विश्वनाथ

(D) जगन्नाथ

**22.** शक्ती ही प्रतिभेहून भिन्न असून शक्ती हेच काव्यनिर्मितीचे एकमेव कारण असे कोणी म्हटले आहे ?

(A) रुद्रट

(B) रुय्यक

(C) राजशेखर

(D) भामह

**23.** रस आणि भाव केवळ नाट्यापुरतेच मर्यादित नसून सर्व प्रकारच्या काव्यांत त्यांचा परिपोष होतो ही विचारसरणी प्रथम कोठे स्वीकृत झाली ?

(A) आनंदवर्धनाच्या ध्वन्यालोकात

(B) अभिनवगुप्ताच्या अभिनवभारतीत

(C) मम्मटाच्या काव्यप्रकाशात

(D) रुद्रटाच्या काव्यालंकारात

**24.** वामनाच्या तीन रीतींत आवन्तिका आणि मागधी या रीतींची भर कोणी घातली ?

(A) विद्याधर

(B) भोज

(C) वाग्भट

(D) जयदेव

**25.** 'साहित्यकृती ही एकजिनसी समष्टी असते. समष्टीच्या अर्थाच्या प्रकाशात साहित्यकृतीच्या घटकांचे स्वरूप आणि त्यांचे सौंदर्यात्म कार्य यांचे विवेचन केले तर ते विश्लेषण साहित्यकृतीच्या सौंदर्याला मारक ठरत नाही.' – ही भूमिका कोणाची ?

(A) माधव आचवल

(B) गंगाधर गाडगीळ

(C) प्रभाकर पाध्ये

(D) गंगाधर पाटील

**26.** रूपवादी समीक्षेवर पुढीलपैकी कोणता आक्षेप घेतला जात नाही ?

(A) रूपवादी मानतात त्या प्रमाणे साहित्यकृती व लेखक आणि साहित्यकृती व समाज यांच्या परस्परसबंधाचा विचार करीत नाही.

(B) रूपवादी समीक्षेमुळे साहित्य कृतीच्या अर्थाचा उलगडा होत नाही.

(C) रूपवादी मानतात त्या प्रमाणे साहित्यकृती ही स्वायत्त व स्वयंपूर्णनसते.

(D) ही समीक्षापद्धती कवितेसारख्या लहान साहित्यप्रकारांच्या बाबतीतच उपयुक्त ठरते.

**27.** विचारप्रणालीचे यादृच्छिक (आर्बिटरी) व सेंद्रिय (ऑरगॅनिक) असेदोन भेद कोणी केले ?

(A) लुई आल्थुसे

(B) आन्तोनिओ ग्रामची

(C) टेरी ईगल्टन

(D) बर्नर्ड क्रिक

**28.** 'समीक्षेच्या संदर्भात कलाकृतीशी होणारी मैत्री' ही संकल्पना कोणी वापरली ?

(A) गंगाधर पाटील

(B) हरिश्चंद्र थोरात

(C) माधव आचवल

(D) वा. ल. कुलकर्णी

**29.** सिद्धान्त आणि विचारवंत यांच्या जोड्या जुळवा.

| | |
|---|---|
| a. संरचनावादी मार्क्सवाद | i. मिखाइल बाख्तीन |
| b. सामूहिक नेणीव | ii. सिमॉनद बॉव्ह |
| c. स्त्रीत्व आणि परभाव | iii. कार्ल युंग |
| d. सिद्धान्तवाद | iv. लुई आल्थुसे |
| | v. कार्ल पॉपर |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (A) | v | iv | iii | i |
| (B) | i | ii | iii | iv |
| (C) | iv | iii | ii | i |
| (D) | v | iii | iv | ii |

**30.** साहित्यप्रकार हे पूर्वनियोजित असतात, त्यांच्या चौकटीतच सामान्यत: साहित्यनिर्मिती होत असते.

(A) संपूर्ण विधान बरोबर

(B) पूर्वार्ध बरोबर उत्तरार्ध चूक

(C) संपूर्ण विधान चूक

(D) उत्तरार्ध बरोबर पूर्वार्ध चूक

CAREERINDIA

**31.** कथा ही संक्षिप्त कादंबरी आणि कादंबरी ही विस्तृत कथा असे का म्हणता येत नाही ?

(A) जीवनानुभवांची व्याप्ती भिन्न असते म्हणून

(B) कथा व कादंबरी यांचे संकल्पनाव्यूह संपूर्ण भिन्न असतात म्हणून

(C) लघुत्व न दीर्घत्व यांच्या मर्यादा अनिश्चित आहेत.

(D) कथा व कादंबरी यांच्या वाचनानंतर होणारे परिणाम भिन्न असतात.

**32.** मूळ साहित्यकृती आणि रूपांतरित साहित्यकृती यांच्या जोड्या लावा.

| | |
|---|---|
| a. अंधाराच्या पारंब्या | i. पोहा चाल्ला महादेवा |
| b. अथांग | ii. रणांगण |
| c. पानिपत | iii. गुंतता हृदय हे |
| d. धग | iv. बॅरिस्टर |
| | v. महासागर |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (A) | i | ii | v | iv |
| (B) | ii | i | iii | v |
| (C) | iii | iv | i | iii |
| (D) | iv | v | ii | i |

**33.** 'श्री विष्णुबाबा ब्रह्मचारी' या चरित्राचे लेखक कोण ?

(A) विनायक कोंडदेव ओक

(B) दत्तात्रय बळवंत पारसनिस

(C) रामचंद्र पांडुरंग आजरेकर

(D) वासुदेवशास्त्री खरे

**34.** "संस्कारपूर्ण व संस्कारमय जीवन जगण्याची देशकाल विशिष्ट रीत (जीवन पद्धती व जीवनमूल्ये) म्हणजे संस्कृती." ही संस्कृतिविषयक व्याख्या कोणाची ?

(A) दुर्गा भागवत

(B) लक्ष्मणशास्त्री जोशी

(C) एम. एस. गोरे

(D) इरावती कर्वे

**35.** "साहित्य आणि संस्कृती हे दोन भिन्न मूलभूत घटक आहेत. पण त्यांच्या द्वंद्वात्मक नात्यानूतनच वाङ्मयीन संस्कृती अस्तित्वात येत असते."

(A) संपूर्ण विधान बरोबर

(B) पूर्वार्ध बरोबर उत्तरार्ध चूक

(C) उत्तरार्ध बरोबर पूर्वार्ध चूक

(D) संपूर्ण विधान चूक

**36.** 'सिद्धान्त रहस्य' हा ग्रंथ कोणाचा ?

(A) गोरक्षनाथ

(B) निवृत्तिनाथ

(C) सत्यामलनाथ

(D) वरदनागेश

**37.** 'जातिभेद विवेकसार', ही पुस्तिका कोणी प्रकाशित केली ?

(A) महात्मा फुले

(B) महादेव गोविंद रानडे

(C) तुकारामतात्या पडवळ व वासुदेव बाबाजी नवरंगे

(D) दयानंद सरस्वती

**38.** 'अनार्यदोष परिहारक मंडळा' ची स्थापना केव्हा झाली ?

(A) १८७३

(B) १८९०

(C) १९०६

(D) १८२७

**39.** सामाजिक दृष्टीने केल्या जाणाऱ्या साहित्याच्या अभ्यासामागील प्रमुख हेतू कोणता ?

(A) साहित्यनिर्मितीची विविधांगी चिकित्सा

CAREERINDIA

(B) समाजजीवनातील बहुविध विचारप्रणालींचा अभ्यास
(C) साहित्याचे समाजशास्त्रीय अवलोकन
(D) साहित्याचे वाङ्मयीन मूल्यमापन

**40.** महानगरीय समाजजीवनात मानसिक ताणतणावाचीं वाढ होत गेल्यामुळे कोणता वाङ्मयीन परिणाम होतो ?
(A) भक्तिपर वाङ्मयाची वाढ
(B) मानसिक समुपदेशन करणाऱ्या साहित्याची निर्मिती
(C) परस्परांतील वाढत्या दुराव्याची अभिव्यक्ती करणारी साहित्यनिर्मिती
(D) दृश्य माध्यमांद्वारे मानसिक कोलाहलाची प्रतीती देणारी कलानिर्मिती

**41.** 'साहित्य आणि समाजजीवन' या ग्रंथातील लेखनावर कोणत्या विचारप्रणालीचा प्रभाव आढळतो ?
(A) मार्क्सवाद
(B) समाजवाद
(C) विज्ञानवाद
(D) गांधीवाद

**42.** गोपाळ, हरिदेशमुख यांनी पस्तीस ग्रंथ लिहिले व त्यातील सुराष्ट्र, 'देशाचा ससाक्ष इतिहास' 'स्थानिक स्वराज्य संस्था', 'स्वामी मद्दयानंद' हे ग्रंथ 'लोकहितवादी' या मासिकात प्रसिद्ध झाले.
(A) संपूर्ण विधान चूक
(B) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर
(C) संपूर्ण विधान बरोबर
(D) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

**43.** इतर राष्ट्रांनी अनेक शतके त्रास सोसून व अनेक देहांचे बळी देऊन जी महत् तत्त्वे शोधून काढली, त्यांचा उपयोग करुन न घेता जर एखादा देश जाणून बुजून अज्ञानात चाचपडत रहात असेल तर या राष्ट्रीय आंधळे पणाबद्दल त्यास परिणामी, भयंकर पश्चाताप झाल्याशिवाय रहाणार नाही – हे विचार कोणाचे ?
(A) जोतीराव फुले
(B) विनायक दामोदर सावरकर
(C) गोपाळ हरि देशमुख 'लोकहितवादी'
(D) बाबा पदमनजी

**44.** तुकाराम तात्या पडवळ यांनी लिहिलेल्या 'जातिभेद विवेकसार' या ग्रंथाची दुसरी आवृत्ती जोतिबा फुले यांनी १८६५ मध्ये प्रकाशित केली असून हे पुस्तक ब्राह्मणेतर चळवळीचा मूलस्रोत आहे, असे म्हटले जाते.
(A) पूर्वार्ध बरोबर उत्तरार्ध चूक
(B) संपूर्ण विधान बरोबर
(C) पूर्वार्ध चूक उत्तरार्ध बरोबर
(D) संपूर्ण विधान चूक

**45.** नियतकालिकांच्या स्थापनाकालाच्या क्रमानुसार लिहा.
(A) ज्ञानचंद्रोदय, ज्ञानोदय, विद्याकल्पतरु, सुज्ञानामृत
(B) ज्ञानोदय, विद्याकल्पतरु, सुज्ञानामृत, ज्ञानचंद्रोदय

CAREERINDIA

(C) ज्ञानोदय, विद्याकल्पतरु, ज्ञानचंद्रोदय, सुज्ञानामृत

(D) सुज्ञानामृत, ज्ञानचंद्रोदय, ज्ञानोदय, विद्याकल्पतरु

**46.** साहित्यातील अश्लीलताविषयक प्रश्नांची साद्यंत चर्चा कोणत्या नियत कालिकाने प्रसिद्ध केली ?

(A) प्रतिष्ठान्

(B) अनुष्टुभ्

(C) अभिरुची

(D) सत्यकथा

**47.** स्त्रीवाद व स्त्रीवादी समीक्षा या विषयास वाहिलेला विशेषांक कोणी प्रसिद्ध केला ?

(A) प्रतिष्ठान

(B) पंचधारा

(C) अनुष्टुभ्

(D) सत्यकथा

**48.** 'रणांगण' मधील शस्त्रसामग्री विकणाऱ्या जगातल्या सर्वात मोठ्या दलालाचे नाव काय ?

(A) कार्ल फ्रांझ

(B) हेर नॉबॅर

(C) बेसील झाराफ

(D) अब्दुल लतीफ

**49.** कधी न त्याचा ती अवमानी फुलता नजराणा !
परि न सोडला तिने आपला कधिही मुग्धपणा
या मौनातच त्यास वाटले अर्थ असे खोल !
तो हि कशाला प्रगट करी मनातले बोल !
या पंक्ती कोणत्या काव्यसंग्रहातील आहेत ?

(A) चांदरात

(B) झेंडूची फुले

(C) रंगमाझा वेगळा

(D) तुटलेले दुवे

**50.** महारोग्याच्या थाळीत जेवणाचा प्रसंग पुढीलपैकी कोणत्या ग्रंथात आढळतो ?

(A) बळी

(B) धग

(C) आठवणींचे पक्षी

(D) श्यामची आई

**51.** 'Mythology is the Pathology of language' हे दैवतकथांच्या संदर्भातील मत कोणाचे ?

(A) जॉर्ज कॉक्स

(B) जेकब ग्रिम

(C) फ्रिडरिक मैक्सम्युलर

(D) विल्हेम ग्रिम

**52.** 'लोक म्हणजे असा समाज जो नागर समाजापासून दूर असतो; व नागर संस्कृतीला विरोध करतो'

(A) संपूर्ण विधान बरोबर

(B) संपूर्ण विधान चुकीचे

(C) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

(D) उत्तरार्ध बरोबर, पूर्वार्ध चूक

**53.** सर जेम्स फ्रेझर याने 'द गोल्डन बाऊ' हा ग्रंथ किती खंडांमध्ये प्रकाशित केला ?

(A) दोन

(B) आठ

(C) बारा

(D) चार

**54.** पोवाडे, लावणी, गोंधळ ही लोकगीते आहेत, त्यांना लौकिक गीते म्हणता येणार नाही.

(A) संपूर्ण विधान बरोबर

(B) संपूर्ण विधान चुकीचे

(C) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

(D) उत्तरार्ध बरोबर, पूर्वार्ध चूक

**55.** प्रभातकाळी निळ्या आभाळात उगवतो सूर्यकांत

मनाचा लागत नाही थांग

पण राव दिसतात तरी शांत

चांदीच्या तबकात मोत्याचे गरे

राव दिसतात बरे, पण तसे वागतील तेव्हा खरे

महादेवाच्या पिंडीवर टरबुजाची फोड

रावांचं बोलणे गोड

पण त्यांना डोळे वटारायची भारी खोड

वरील उखाण्यांतून ध्वनित होणारा प्रदान अर्थ कोणता ?

(A) नववधूच्या मनातील भावनांची आंदोलने

(B) पतीच्या मनाचा पत्नीला न लागणारा थांग

(C) समूहामध्ये केलेली थट्टामस्करी

(D) पत्नीने पतीच्या स्वभाववैशिष्ट्यांचा केलेला निर्देश

**56.** एकसाहित्याधिष्ठित अभ्यासापेक्षा अनेक साहित्याधिष्ठित अभ्यासाची कक्षा व्यापक असते; अशा व्यापक कक्षेत प्रकट तुलना करणे हे ज्या साहित्याभ्यासाचे प्रमुख लक्षण आहे त्याला "तौलनिक साहित्याभ्यास" म्हणावे.

(A) संपूर्ण विधान चूक

(B) उत्तरार्ध बरोबर, पूर्वार्ध चूक

(C) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

(D) संपूर्ण विधान बरोबर

**57.** शेक्सपिअरच्या नाटकांचे अनुवाद किंवा रूपांतर करणे, तत्सम कृती निर्माण करावयास प्रेरित होणे, शेक्सपिअरच्या अभ्यासासाठी मंडळे स्थापन करणे ही सर्व कशाची गमके म्हणता येतील ?

(A) प्रभवाची

(B) प्रभावाची

(C) वस्तुबीज विकासशास्त्राची

(D) अनुसरणशीलतेची

**58.** 'मी गुजराती भाषेत लिहिणारा भारतीय साहित्यिक आहे' असे कोणी म्हटले ?

(A) कन्हैयालाल मुन्शी

(B) झवेरचंद मेघाणी

(C) राजेंद्र शाह

(D) उमाशंकर जोशी

CAREERINDIA

**59.** एखाद्या साहित्यिकाच्या लेखनाचा प्रभाव अन्य भाषांवर पडतो यामागे साहित्येतर कारणे असू शकतात याचे उत्तम उदाहरण म्हणजे -

(A) ना. सी. फडके

(B) वि. स. खांडेकर

(C) रणजित देसाई

(D) भाऊ पाध्ये

**60.** प्रभव ही संकल्पना वादातीत नाही. 'एखाद्या साहित्यकृतीने दुसऱ्या साहित्यकृतीला जन्म दिला ही कल्पना नितांत त्याज्य आहे', असे कोणी म्हटले ?

(A) वेर्नर फ्रीड्रिख

(B) ऑस्कर कॅम्पबेल

(C) रेने वेलेक

(D) सी. एल. रेन

**61.** स्त्रीवादी साहित्याभ्यास स्त्रियांच्या साहित्यातून प्रकटणाऱ्या स्त्रीजीवनाची चिकित्सा करतो तसेच पुरुषांच्या साहित्याचे स्त्रीवादी दृष्टिकोणातून पुनर्वाचन करतो.

(A) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

(B) संपूर्ण विधान बरोबर

(C) संपूर्ण विधान चूक

(D) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

**62.** स्त्रीवादी साहित्य समीक्षा काय साधत असते ?

(A) स्त्रीचित्रणाचा वेध घेते.

(B) स्त्रीपुरुषांतील परस्परसंबधांची उकल करते.

(C) साहित्यकृतींचे वाङ्मयीन मूल्यांकन करते.

(D) साहित्यकृतीच्याविश्लेषणाद्वारे पुरुषसत्ताक जीवनपद्धतीत स्त्रियांना असलेल्या दुय्यम स्थानाचा बोध घडविते.

**63.** साहित्यकृती व लेखिका यांच्या जोड्या जुळवा.

| | |
|---|---|
| a. मुलांचे बंड | i. गीता साने |
| b. लग्नाचा बाजार | ii. कृष्णाबाई मोटे |
| c. लतिका | iii. यशोदा भट |
| d. मीनाक्षीचे स्वप्न | iv. शांताबाई नाशिककर |
| | v. कमल पाध्ये |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (A) | v | iv | iii | ii |
| (B) | iii | iv | i | ii |
| (C) | v | iii | i | ii |
| (D) | i | ii | iii | iv |

**64.** 'कौटुंबिक कायदे आणि सामाजिक परिवर्तन' हे लेखन कोणाचे ?

(A) सुनीती पुंगलिया

(B) इरावती कर्वे

(C) चित्रा नाईक

(D) शकुंतला नारगोळकर

**65.** पुढीलपैकी कोणते लेखन कवितासंग्रह नाही ?

(A) गुलमोहोर

(B) मेंदी

(C) अप्रूप

(D) पूर्वसंध्या

**66.** पुढीलपैकी कोणती कादंबरी खेड्यातल्या माणसाचे घरातले तुटलेपण दाखवते ?

(A) जगबुडी
(B) भुईतून उगवलेला माणूस
(C) देवाची घंटा
(D) आलेख

**67.** ग्रामीण साहित्यात अन्य अनेक घटकांप्रमाणे कृषिजीवनचित्रण हा एक महत्त्वाचा घटक असतो, नागर लेखकांच्या लेखनात हेच घटक वास्तवपूर्ण पद्धतीने व प्रभावीपणे मांडलेले आढळतात.
(A) संपूर्ण विधान बरोबर
(B) संपूर्ण विधान चुकीचे
(C) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर
(D) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

**68.** 'गावोगावी हीच बोंब' हे ग्रामीण नाटक कोणी लिहिले ?
(A) हरिभाऊ जवळगे
(B) दिलीप मगदूम
(C) वसंत मंडले
(D) रा. आ. अंधारे

**69.** पुढील साहित्यकृती प्रकाशनाच्या कालानुक्रमे लिहा.
(A) येरझार, शाबीक, काजोर, रानभिडी
(B) रानभिडी, काजोर, शाबीक, येरझार
(C) काजोर, रानभिडी, येरझार, शाबीक
(D) शाबीक, येरझार, रानभिडी, काजोर

**70.** पुढील कथासंग्रह व कथाकार यांच्या जोड्या जुळवा.

| | |
|---|---|
| a. तपझिरा | i. चंद्रकांत काकोडकर |
| b. दूर गेलेले घर | ii. द. ता. भोसले |
| c. अन्नपूर्णा | iii. म. भा. भोसले |
| d. मी आणि माझा बाप | iv. लक्ष्मीकांत तांबोली |
| | v. दिनकर देशपांडे |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (A) | iii | ii | iv | v |
| (B) | v | iv | i | ii |
| (C) | iv | iii | ii | i |
| (D) | i | ii | iii | iv |

**71.** 'अरे, मी देवाची मुरळी, पण मला माणसांनी लुटलं ! दगडाला देवपण आलं, पण माणसांचे दगड झाले.... सगळा उलटा न्याय !' वरील वाक्य कोणत्या कथेतील आहे ?
(A) पोतराज
(B) कोल्हाटी
(C) डोंबारी
(D) मुरळी

**72.** भीक मागून उपजीविका करणाऱ्या मांग-गारुडी व डोंबारी या दलित जमातींचे चित्रण पुढीलपैकी कोणत्या कादंबरीत आढळते ?
(A) भाकरी आणि फूल
(B) त्रिशंकू
(C) वस्ती
(D) कार्तिकी

**73.** जोड्या लावा : कादंबरी व कादंबरीकार

| | |
|---|---|
| a. पाझर | i. उत्तम मारुती कांबळे |
| b. पारधी | ii. आण्णाभाऊ साठे |
| c. श्राघ | iii. ज. वि. पवार |
| d. बलिदान | iv. शंकरराव खरात |
| | v. बाबुराव बागूल |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (A) | ii | iv | i | iii |
| (B) | iv | iii | ii | i |
| (C) | iii | ii | iii | iv |
| (D) | i | v | iv | ii |

**74.** नेहमी नेहमी

CAREERINDIA

त्याच त्याच गोष्टी
सांगण्याची नि ऐकण्याची
सवयच झाली आपल्याला
आता आपले कान कापले पाहिजेत
नि सांगणाऱ्याचे तोंड फोडले पाहिजे...

वरील कवितेच्या ओळी कोणाच्या ?

(A) राजेंद्र सोनवणे
(B) उत्तम अंभोरे
(C) प्रज्ञा पवार
(D) वामन निंबाळकर

**75.** 'दलित नाटके विद्रोही आहेत, पण या मातीशी द्रोह करणारी नाहीत. ती कडवट आहेत, पण कटू सत्य सांगणारी आहेत. ती विदारक आहेत पण अवास्तव नाहीत. त्यांच्या निर्मिती व लेखनामध्ये इथल्या समाजबदलाचा, जातिव्यवस्था मोडण्याचा आणि राष्ट्राच्या एकात्मतेचा मोड आहे.' हे मत कोणाचे ?

(A) गंगाधर पानतावणे
(B) दत्ता भगत
(C) रामनाथ चव्हाण
(D) प्रेमानंद गज्वी

www.careerindia.com

**Space For Rough Work**

www.careerindia.com